पंचायत समिती तलासरी					
समाजकल्याण विभाग					
अ. क्र.	योजनेचे नांव (वैयक्तीक/सामुहिक)	लाभार्थी निवडीचे निकष	लाभाचे स्वरुप	शासन निर्णय/परित्रका/पत्रा अन्वये तो संदर्भ क्रमांक व दिनांक	शेरा
1	मागासवर्गीय लाभार्थ्यांना घरघंटी पुरविणे.	1. लाभार्थी मागासवर्गीय (अनु. जाती/ अनु .जमाती /विजाभज) असावा.	वैयक्तिक लाभाच्या योजनांसाठी वस्तूंचे अनुदान वस्तूस्वरूपात न देता रक्कम स्वरूपात अनुदान लाभार्थ्यांच्या खाती थेट जमा करणेचे आहे.	नियोजन विभाग शासन निर्णय क्रं .डीसीटी२३१६/प्र.क्रं. १३३/का.१४१७ दि. ०५ डिसेंबर २०१६ .	
		2. जातीचा दाखला सक्षम अधिका–याचा असणे आवश्यक			
		3. वार्षिक उत्पन्नाचा दाखला सक्षम अधिका–याचा असणे आवश्यक			
		4. दारीद्रय रेषेचा क्रमांकाचा दाखला			
		5. लाभार्थी स्थानिक			

		असल्याचा दाखला			
		6. विजेची जोडणी आवश्यक (लाईट बिल)			
		7. समाज कल्याण योजनेतुन यापुर्वी लाभ न दिल्याचा ग्रामसेवकाचा दाखला.			
2	मागासवर्गीय लाभार्थ्यांना डिस्को जॅकी (DJ) साहित्य पुरविणे.	1. लाभार्थी मागासवर्गीय (अनु. जाती/ अनु .जमाती /विजाभज) असावा.	वैयक्तिक लाभाच्या योजनांसाठी वस्तूंचे अनुदान वस्तूस्वरूपात न देता रक्कम स्वरूपात अनुदान लाभार्थ्यांच्या खाती थेट जमा करणेचे आहे.	नियोजन विभाग शासन निर्णय क्रं .डीसीटी२३१६/प्र.क्रं. १३३/का.१४१७ दि. ०५ डिसेंबर २०१६ .	
		2. जातीचा दाखला सक्षम अधिका–याचा असणे आवश्यक			
		3. वार्षिक उत्पन्नाचा दाखला सक्षम अधिका–याचा असणे आवश्यक			
		4. दारीद्रय रेषेचा क्रमांकाचा दाखला			
		5. लाभार्थी स्थानिक			

		असल्याचा दाखला			
		6. समाज कल्याण योजनेतुन यापुर्वी लाभ न दिल्याचा ग्रामसेवकाचा दाखला.			
3	मागासवर्गीय विदयार्थ्यांना सायकली पुरविणे (इयत्ता 5 वी ते 9 वी).	1. लाभार्थी मागासवर्गीय (अनु. जाती/ अनु .जमाती /विजाभज) असावा.	वैयक्तिक लाभाच्या योजनांसाठी वस्तूंचे अनुदान वस्तूस्वरूपात न देता रक्कम स्वरूपात अनुदान लाभार्थ्यांच्या खाती थेट जमा करणेचे आहे.	नियोजन विभाग शासन निर्णय क्रं .डीसीटी२३१६/प्र.क्रं. १३३/का.१४१७ दि. ०५ डिसेंबर २०१६ .	
		2. जातीचा दाखला सक्षम अधिका–याचा असणे आवश्यक			
		3. वार्षिक उत्पन्नाचा दाखला सक्षम अधिका–याचा असणे आवश्यक			
		4. दारीद्रय रेषेचा क्रमांकाचा दाखला			
		5. लाभार्थी स्थानिक असल्याचा दाखला			
		6. घरापासून शाळेचे अंतर			

		किमान 3 कि.मी. लांब असावे.			
		7. समाज कल्याण योजनेतुन यापुर्वी लाभ न दिल्याचा ग्रामसेवकाचा दाखला.			
4	मागासवर्गीय लाभार्थ्यांना शिलाई मशिन पुरविणे	1. लाभार्थी मागासवर्गीय (अनु. जाती/ अनु .जमाती /विजाभज) असावा.	वैयक्तिक लाभाच्या योजनांसाठी वस्तूंचे अनुदान वस्तूस्वरूपात न देता रक्कम स्वरूपात अनुदान लाभार्थ्यांच्या खाती थेट जमा करणेचे आहे.	नियोजन विभाग शासन निर्णय क्रं .डीसीटी२३१६/प्र.क्रं. १३३/का.१४१७ दि. ०५ डिसेंबर २०१६ .	
		2. जातीचा दाखला सक्षम अधिका–याचा असणे आवश्यक			
		3. वार्षिक उत्पन्नाचा दाखला सक्षम अधिका–याचा असणे आवश्यक			
		4. दारीद्रय रेषेचा क्रमांक असले बाबतचा दाखला			
		5. लाभार्थी स्थानिक असल्याचा दाखला			

		6. शासनमान्य संस्थेतील शिलाई मशिन प्रशिक्षण पुर्ण केल्याबाबतचे प्रमाणपत्र			
		7. समाज कल्याण योजनेतुन यापुर्वी लाभ न दिल्याचा ग्रामसेवकाचा दाखला.			
5	मागासवर्गीय विदयार्थ्यांना शिक्षणासाठी आर्थिक अर्थसहाय्य(एकवेळ) करणे.	1. लाभार्थी मागासवर्गीय (अनु. जाती/ अनु .जमाती /विजाभज) असावा.	वैयक्तिक लाभाच्या योजनांसाठी वस्तूंचे अनुदान वस्तूस्वरूपात न देता रक्कम स्वरूपात अनुदान लाभार्थ्यांच्या खाती थेट जमा करणेचे आहे.	नियोजन विभाग शासन निर्णय क्रं .डीसीटी२३१६/प्र.क्रं. १३३/का.१४१७ दि. ०५ डिसेंबर २०१६ .	
		2. जातीचा दाखला सक्षम अधिका–याचा असणे आवश्यक			
		3. वार्षिक उत्पन्न रु 20,000/– पर्यत असणे आवश्यक			
		4. किमान 12 वी ते पदवी /अभियांत्रिकी			

		/वैदयकिय शिक्षणासाठी प्रवेश घेतलेला असावा.			
		5. दारीद्रय रेषेचा क्रमांक असले बाबतचा दाखला			
		6. लाभार्थी स्थानिक असल्याचा दाखला			
		7. समाज कल्याण योजनेतुन यापुर्वी लाभ न दिल्याचा ग्रामसेवकाचा दाखला.			
6	मागासवर्गीय लाभार्थ्यांना सिमेंट पत्रे पुरविणे	1. लाभार्थी मागासवर्गीय (अनु. जाती/ अनु .जमाती /विजाभज) असावा.	वैयक्तिक लाभाच्या योजनांसाठी वस्तूंचे अनुदान वस्तूस्वरूपात न देता रक्कम स्वरूपात अनुदान लाभार्थ्यांच्या खाती थेट जमा करणेचे आहे.	नियोजन विभाग शासन निर्णय क्रं .डीसीटी२३१६/प्र.क्रं. १३३/का.१४१७ दि. ०५ डिसेंबर २०१६ .	
		2. जातीचा दाखला सक्षम अधिका–याचा असणे आवश्यक			
		3. वार्षिक उत्पन्न रु 20,000/– असणे आवश्यक .			

		4. दारीद्रय रेषेचा क्रमांक असले बाबतचा दाखला			
		5. लाभार्थी स्थानिक असल्याचा दाखला			
		6. लाभार्थ्याचे घर नमुना नंबर आठमध्ये असणे आवश्यक			
		7. लाभार्थ्याच्या नावावर घर असावे.			
		8. समाज कल्याण योजनेतुन यापुर्वी लाभ न दिल्याचा ग्रामसेवकाचा दाखला.			
7	मागासवर्गीय लाभार्थ्यांना घरदुरुस्तीसाठी अर्थसहाय्य करणेबाबत.	1. लाभार्थी मागासवर्गीय (अनु. जाती/ अनु .जमाती /विजाभज) असावा.	वैयक्तिक लाभाच्या योजनांसाठी वस्तूंचे अनुदान वस्तूस्वरूपात न देता रक्कम स्वरूपात अनुदान लाभार्थ्याच्या खाती थेट जमा करणेचे आहे.	नियोजन विभाग शासन निर्णय क्रं .डीसीटी२३१६/प्र.क्रं. १३३/का.१४१७ दि. ०५ डिसेंबर २०१६ .	
		2. जातीचा दाखला सक्षम अधिका–याचा असणे आवश्यक			

		3. वार्षिक उत्पन्नचा दाखला सक्षम अधिका–याचा असणे आवश्यक			
		4. लाभार्थ्यांच्या नावावर घर असावे.			
		5. दारीद्रय रेषेचा क्रमांक असले बाबतचा दाखला			
		6. लाभार्थी स्थानिक असल्याचा दाखला			
		7. समाज कल्याण योजनेतुन यापुर्वी लाभ न दिल्याचा ग्रामसेवकाचा दाखला.			
		8. उपअभियंता बांधकाम उपविभाग यांचे अंदाजपत्रक			
8	मागासवर्गीय लाभार्थ्यांना पापड मशिन पुरविणे.	1. लाभार्थी मागासवर्गीय (अनु. जाती/ अनु .जमाती /विजाभज)	वैयक्तिक लाभाच्या योजनांसाठी वस्तूंचे अनुदान वस्तूस्वरूपात न देता रक्कम	नियोजन विभाग शासन निर्णय क्रं .डीसीटी२३१६/प्र.क्रं. १३३/का.१४१७ दि. ०५ डिसेंबर २०१६ .	

		असावा.	स्वरूपात अनुदान लाभार्थ्यांच्या खाती थेट जमा करणेचे आहे.		
		2. जातीचा दाखला सक्षम अधिका–याचा असणे आवश्यक			
		3. वार्षिक उत्पन्नाचा दाखला सक्षम अधिका–याचा असणे आवश्यक			
		4. दारीद्रय रेषेचा क्रमांकाचा दाखला			
		5. लाभार्थी स्थानिक असल्याचा दाखला			
		6. विजेची जोडणी आवश्यक (लाईट बिल)			
		7. समाज कल्याण योजनेतुन यापुर्वी लाभ न दिल्याचा ग्रामसेवकाचा दाखला.			
9	आतर जातीय विवाह	1. विहित नुमना अर्ज		नियोजन विभाग शासन निर्णय क्रं .डीसीटी२३१६/प्र.क्रं. १३३/का.१४१७ दि.	
		2. विवाह नोंदणी दाखला	वैयक्तिक लाभाच्या योजनांसाठी		
		3. वराचा शाळा			

		सोडल्याचा दाखला (वर व वधुचे)	वस्तूंचे अनुदान वस्तूस्वरूपात न देता रक्कम स्वरूपात अनुदान लाभार्थ्यांच्या खाती थेट जमा करणेचे आहे.	०५ डिसेंबर २०१६ .	
		4. वरचा जातीचा दाखला(अनु .जमाती)			
		5. वधुचा जातीचा दाखला(इमाव)			
		6. दोन प्रतिष्ठीत व्यक्तीचे शिफारस पत्र (वर व वधुचे)			
		7. महाराष्ट्र रहिवासी दाखला (वर व वधुचे)			
		8. सदर योजनेचा यापुर्वी लाभ घेतला नसल्याचे प्रतिज्ञापत्र 100 रु. स्टॅम्प पेपरवर			
10	दलित वस्ती सुधार योजना	1. ग्रामपंचायतीचा ठराव	1.पाणी पुरवठा कामे 2.मल:निसारण कामे 3.पोहच रस्ते 4.अंतर्गत रस्ते 5.समाज मंदिर	1. शासन निर्ण क्र.दवसु-2008/प्र.क्र. 524/ विघयो-अे दि.14 नोव्हें, 2008.	
		2. प्रस्तावित कामाचे अंदाजपत्रक		2. शासन निर्ण क्र.दवसु 2011/ प्र.क्र.442/अजाक दि.5 डिसें,2011.	
		3. कामाचा नकाशा		3.शासन निर्ण क्र.दवसु-2013/ प्र.क्र.85/अजाक दि.1 ऑगस्ट 2013.	
		4. ग्रामपंचायतीचे उत्पन्नाचे नमुना नं.3/4			

		5. विहित रक्कमेपेक्षा जादा निधी लागल्यास ग्रामपंचायत करण्यास तयार असल्याचा दाखला			
11	जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांनी त्यांच्या स्वउत्पन्नाच्या ३ टक्के निधीतून घ्यावयाच्या अपंग कल्याणासाठी योजना	अर्जदार अंपग असावा, अंपग असल्याचा पुरावा/दाखला, इतर योजनेतून लाभ न घेतल्याबाबतचा दाखला.	वैयक्तिक लाभाच्या योजनांसाठी वस्तूंचे अनुदान वस्तूस्वरूपात न देता रक्कम स्वरूपात अनुदान लाभार्थ्यांच्या खाती थेट जमा करणेचे आहे.	नियोजन विभाग शासन निर्णय क्रं .डीसीटी२३१६/प्र.क्रं. १३३/का.१४१७ दि. ०५ डिसेंबर २०१६ . ग्रामविकास विभाग शासन निर्णय क्रं. अंपग २०१५/प्र.क्रं .१३७/वित्त३/ दि. २४/११/२०१५.	
नियोजन विभाग शासन निर्णय क्रं.डीसीटी२३१६/प्र.क्रं.१३३/का.१४१७ दि. ०५ डिसेंबर २०१६ च्या निर्णयान्वये वैयक्तिक लाभाच्या योजनांसाठी वस्तूंचे अनुदान वस्तूस्वरूपात न देता रक्कम स्वरूपात अनुदान लाभार्थ्यांच्या खाती थेट जमा करणेचे आहे.					

वैयक्तीक योजना

वैयक्तीक लाभाच्या सर्व योजनांकरीता खालील निकष सारखे असुन त्याव्यतीरिक्त आवश्यक अटी रकाना क्र.३ मध्ये नमुद आहेत.

1. लाभार्थी अनुसूचीत जाती,जमाती /विमुक्त जाती व भटक्या जमाती या संवगार्तील असावा.
2. वार्षीक उत्पन्नाची मयार्दा रु. २०,०००/ व अपंगाचे बाबतील रु. ४०,०००/ मयार्देपयंत असुन उत्पन्नाचा दाखला संबंधीत तलाठी व ग्रामसेवकाचा आवश्यक
3. दारिद्रय.रेषेखालील यादीत कुटुंबीयाचे नाव असलेल्या लाभाथ्यांर्ना प्रथम प्राधान्य देण्यात यावे.
4. लाभाथ्यांर्च्या कुंटुंबातील कोणतीही व्यक्ती शासकिय अथवा निमशासकिय सेवेत नसावी.
5. योजनेचा लाभ लाभार्थ्यांस एकाच वेळी दुबार मिळणार नाही.
6. शा. नि. क्रं. मागास/१०९८/प्रक्र.७३/३४ दि. २०/१०/१९९९ नुसार नमूद केलेल्या अटी व शर्ती लाभार्थीवर बंधनकारक राहतील.

अ. क्र.	योजनांचे नांव	पात्रतेबाबतचे निकष
१	अनुदानित वसतीगृहातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना दप्तर ,रेनकोट, छत्री व स्वेटर पुरविणे विद्यार्थ्यी/विद्यार्थिनींचा प्रवेश अनुदानित वसतीगृहात नियमीत असावा व शाळेत शिकत असावा. सदरचा लाभ इ. 5 वी ते 9 पर्यतच्या मुला-मुलींना देय आहे.	वसतीगृह अधिक्षकांकडून लाभार्थी विद्यार्थ्याची यादी प्राप्त करण्यात येइल.
२	मागासवर्गीयांना शिक्षणासाठी आर्थिक सहाय्य करणे (एकवेळ)	१)विद्यार्थी शिक्षण घेत असावा. किमान 12 वी पास व त्यापुढील शिक्षणासाठी प्रवेश घेतलेला असावा. २) लाभार्थ्यांने यापुर्वी लाभ घेतला नसावा.इ. 12 वी ते पदवीधर पर्यंत शिक्षणास आर्थिक सहाय्य मिळणेच्या उददेशाने योजना कार्यान्वीत
३	मागासवर्गीय विद्यार्थ्यांना संगणक MSCIT प्रशिक्षण देणे	१) लाभार्थी इयत्ता बारावी उत्तीर्ण असावा. २) संगणक प्रशिक्षण ज्या वर्षात घेतले त्याच वर्षात फी देय राहिल. .
४	मागासवर्गीय लाभार्थ्यांना नवीन घरबांधणी अथवा	१) लाभार्थी निवड ग्रामसभेत करण्यात यावी.

	घरदुरुस्तीसाठी अर्थसहाय्य	२)लाभार्थ्यांचे नांवे घर असावे ३) सदर योजनेतंर्गत प्रती लाभार्थी रु. ४००००/- अनुदान मर्यादा राहिल.
५	मागासवर्गीय गरोदर महिलांना शासकिय संस्थेत बाळंत झाल्यास त्यांना मच्छरदाणी व अनुषंगिक साधने पुरविणे	१)गरोदर महिलांची नोंद शासकिय संस्थेत केलेली असावी २)संस्था नोंदणीकृत व शासनमान्य असणे आवश्यक
६	मागासवर्गीय लाभार्थ्यास बॅन्जो संच पुरविणे.	१) सदरचा लाभ एका गावातील कमीत कमी ११लाभार्थीच्या सामुहिक गटास देण्यात येईल. २) लाभार्थ्यांच्या कुंटुंबातील कोणतीही व्यक्ती शासकिय अथवा निमशासकिय सेवेत नसावी. ३) योजनेचा लाभ सदर गटास/पथकास देण्यात आलेला नसल्याबाबत ग्रा.पं. चा दाखला घेणे आवश्यक आहे गटास/पथकास एकाच वेळी दुबार लाभ मिळणार नाही. ४) बॅन्जो गट/पथकाची निवड ग्रामसभेत करण्यात यावी. ५) सदर गटास/पथकास दिलेल्या साहित्याचा दुरुपयोग केला जाणार नाही याबाबत दुरुपयोग झाल्यास रक्कम गटातील/पथकातील सर्व लाभार्थींची स्टॅम्पपेपरवर एकत्रित प्रतिज्ञापत्र घेण्यात यावे. ६) गटातील/पथकातील लाभार्थी बॅन्जो वाजविण्याचे काम करीत असलेबाबत ग्रामसेवक यांचा दाखला घेणे आवश्यक आहे.

		७) एका कुंटुंबातील एकाच लाभार्थीस पथकात घेणे आवश्यक आहे. ८) साहित्य देखभाल दुरुस्ती संबंधीत पथकाने/गटाने वैयक्तिकरित्या करावी. ९) पथकातील /गटातील लाभार्थींनी बॅन्जो साहित्य विकल्यास भाडयाने दिल्यास साहित्याच्या किंमती एवढी रक्कम एक रकमी वसूल करण्यात येईल.
७	मागासवर्गीय लाभार्थ्यांना घरघंटी पुरविणे	१) लाभार्थींस वस्तूस्वरुपात लाभ देण्यात येईल. २) लाभार्थीकडून लाभाचा दुरुपयोग होणार नाही असा करारनामा रु.१००/- चे स्टॅम्पपेपरवर करुन घेणेत येईल. ३) घरघंटी व्यवसायासाठी स्वतःच्या मालकीची जागा असल्यास त्याबाबत जागेचा उतारा ग्रा.पं ८ क जोडावा. ४) विजेची सोय असल्याबाबतचा पुरावा देण्यात यावा. ५) घरघंटी गॅरंटी कालावधीनंतर नादुरुस्त झाल्यास दुरुस्ती लाभार्थीने स्वतः करावी.
८	मागासवर्गीय लाभार्थ्यांना पापड मशिन पुरविणे	१) लाभार्थींस वस्तूस्वरुपात लाभ देण्यात येईल. २) लाभार्थीकडून लाभाचा दुरुपयोग होणार नाही असा

		करारनामा रु.१००/- चे स्टॅम्पपेपरवर करुन घेणेत येईल. ३) पापड मशिन व्यवसायासाठी स्वतःच्या मालकीची जागा असल्यास त्याबाबत जागेचा उतारा ग्रा.पं ८ क जोडावा. ४) विजेची सोय असल्याबाबतचा पुरावा देण्यात यावा. ५) पापड मशिन गॅरंटी कालावधीनंतर नादुरुस्त झाल्यास दुरुस्ती लाभार्थीने स्वतः करावी.
९	मागासवर्गीय लाभार्थ्यांना शिलाई मशिन पुरविणे	१) लाभार्थींस वस्तूस्वरुपात लाभ देण्यात येईल. २) लाभार्थीकडून लाभाचा दुरुपयोग होणार नाही असा करारनामा रु.१००/- चे स्टॅम्पपेपरवर करुन घेणेत येईल. ३) लाभार्थी इ. 4 थी पास असावा ४)लाभार्थ्याचे शिवणकामाचे प्रशिक्षण केल्याचे शासनमान्य संस्थेचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. ५) साहित्य पुरविल्यानंतर देखभाल दुरुस्तीची जबाबदारी लाभार्थ्यांची राहील.
१०	इ. ५ वी ते ९ वीच्या मागसवगी्रय विद्यार्थ्यांना सायकली पुरविणे	१)इ. ५ वी प्रवेश घेतलेल्या तसेच इ. ८ वीत प्रवेश घेतलेला असावा. २)लाभार्थ्यांचे घर ते शाळेतील अंतर कमीत कमी २

		कि.मी असावे. ३)लाभार्थीकडून लाभाचा दुरुपयोग होणार नाही असा करारनामा रु.१००/- चे स्टॅम्पपेपरवर करुन घेणेत येईल

सामुहिक योजना

अ.क्र.	योजनांचे नाव	पात्रतेबाबतचे निकष
१	मागासवर्गीय वस्तीत जोडरस्ते बांधणे	१) योजनेची प्रसिध्दी पंचायत समित्यांनी ग्रामस्तरावर सर्वदुर करावी. २) योजनेचा लाभ यापूर्वी एकादाही मिळालेला नाही अशा मागासवर्गीय वस्त्यांना प्राधान्य देण्याची दक्षता घ्यावी. ३) प्रस्ताव ग्रामसभेकडून शिफारस होऊन संबधित गट विकास अधिकारी यांचे मार्फत समाज कल्याण विभागास विहित प्रपत्रात प्राप्त झालेनंतर समाज कल्याण समिती मध्ये मान्यता देण्यात येईल ४) सदरची योजना मागासवर्गीय वस्ती मध्ये राबविण्यात यावी
२	मागासवर्गीय वस्तीमधील समाज मंदिरामध्ये भांडी,खुर्चा,सतरंजी पुरविणे,	१) या योजनेतंर्गत पूर्वी लाभ दिलेला नसावा. २) मागासवर्गीय वस्तीमध्ये समाज मंदिर बांधून इमारत सुसज्ज असणे आवश्यक आहे. ३) योजनेची निवड ग्रामसभेत करण्यात यावी..
३	दलितवस्ती सुधारणा अंतर्गत बांधलेल्या समाज मंदिरांची अपुर्ण कामे पुर्ण करणे व समाज मंदिर पाणी पुरवठयासह दोन शौचालय,दोन स्नानगृह बांधणे अर्थसहाय्य	१) सदर योजना मागासवर्गीय संवर्गातील दलितवस्तीमध्ये राबविण्यात येईल. २) प्रस्ताव सादर करतांना ग्रामसभेत कामास मान्यता घेतलेली असावी .

शासकीय योजना

दलितवस्ती सुधार योजना: सदर योजनेअंतर्गत ग्रामीण भागातील दलित वस्त्रयांमध्ये स्वच्छता विषयक सोयी,पाणी पुरवठा,समाजमंदिर, अंतर्गत रस्ते,गटार इत्यादी व्यवस्था करुन दलित वस्तींची स्थिती सुधारणे हा या योजनेचा उद्देश आहे. या योजनेअंतर्गत प्रत्येक गावास शासन् निर्णय

दिनांक १४ नोव्हेंबर २००८ अन्वये लोकसंख्येच्या निकषानुसार जास्तीत जास्त रुपये १०.०० लाख अनुदान दिले जाते.सदर शासन निणर्यानुसार प्रत्येक दलित वस्तीला अनुसूचीत जातीच्या लोकसंख्येच्या प्रमाणात पुढीलप्रमाणे अनुदान मंजूर करणेत येते.

सदरचा प्रस्ताव शासन् धोरण व निणयार्तील तरतूदींनुसार योग्य त्या कागदपत्रांसह ग्रामसभेच्या मंजुरीने ग्रामपंचायती मार्फत प्रस्ताव तयार करुन गट विकास अधिकारी यांचेमार्फत जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण विभागाकडे सादर करणेत यावेत.

समाजकल्याण विभागामार्फत राबविणेंत येणा-या शिष्यवृत्ती

२) माध्यमिक शाळेतील विद्याथ्यांर्ना शिष्यवर्त्ती - शिक्षणक्षेत्रातील मागासवर्गीय विद्याथ्यांर्ना या योजनेअंतर्गत शिष्यवृत्ती दिली जाते.सदर योजनेसाठी उत्पन्नाची अट नाही. प्रत्येक प्रवगार्तील प्रत्येक इयत्तेमधील गुणानुक्रमे प्रथम दोन विद्याथ्यांर्ना कमीत कमी ५०% गुण आहेत त्यांना या योजनेमधुन मागासवर्गिय विद्याथ्यांर्ना इ.५ वी ते ७ वी दरमहा रु. ५०/ आणि इ. ८ वी ते १० वी दरमहा रु.१००/- प्रमाणे दहा महिन्यांसाठी शिष्यवृत्ती देण्यात येते. या शिष्यवृत्तीसाठी उत्पन्नाची अट नाही व विदयार्थ्यास अर्ज करण्याची आवश्यकता नाही. यासाठी संबंधीत तालुक्यांच्या गट शिक्षणाधिकारी यांचेकडे शाळेमार्फत प्रस्ताव सादर करण्यात यावेत.

३) इयत्ता ५ वी ते ७ वीमधील मागासवर्गीय मुलींना सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती - मागासवर्गीय मुलींचे (अ.जा./वि.जा.भ.ज./वि.मा.प्र. प्रवगामर्धील) प्राथमिक शाळेमधील गळतीचे प्रमाण रोखण्याच्या दृष्टिने इ. ५ वी ते ७ वीमधील मुलींना दरमहा रु. ६०/ प्रमाणे दहा महिन्यांसाठी ही शिष्यवृत्ती दिली जाते. सदर शिष्यवृत्तीसाठी उत्पन्नाची अट नाही.नियमित उपस्थिती आवश्यक.ऑनलाइन लाभ देय.

४) इ. ८ वी ते १० वीमध्ये शिकणा-या अनु.जातीच्या मुलींकरीता सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती - इ. ८वी ते १० मधील मागासवर्गीय मुलींचे (अ.जा./वि.जा.भ.ज./वि.मा.प्र. प्रवगामर्धील) गळतीचे प्रमाण रोखणे व मुलींचे शैक्षणीकदृष्टया प्रभावी गतीने प्रगती व्हावी या उद्देषाने शासनाने दिनांक १५ जुलै २००३ मध्ये ही योजना सुरु केली आहे.सदर योजनेअंतर्गत प्रत्येक विद्याथीर्नीस दरमहा रु. १००/ प्रमाणे दहा महिन्यांसाठी संबंधीत शिक्षण संस्थेमार्फत शिष्यवृत्ती अदा करणेत येते. सदर शिष्यवृत्तीसाठी उत्पन्नाची अट नाही.नियमित उपस्थिती आवश्यक.ऑनलाइन लाभ देय.

५) अस्वच्छ व्यवसायात काम करणा-या पालकांच्या मुलांना भारत सरकार मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती : अस्वच्छ व्यवसायात काम करणा-या पालकांच्या इयत्ता १ ली ते १० वी पर्यंत शिकत असलेल्या मुलांना भारत सरकार मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती देण्याची योजना राबविणेत येते. सदरची योजना केंद्ग पुरस्कृत असुन त्यासाठी उत्पन्नाची कोणतीही अट नाही. सदर शिष्यवृत्ती सर्व जाती/धमार्ला तसेच परंपरागत अस्वच्छ व्यवसायात काम करणा-या पालकांच्या मुलांना लागू आहे. उदा. कातडी कमविणे,कातडी सोलणे,मानवी विष्ठा वहन करणे,किंवा बंदिस्त व उघडया गटारांची साफसफाई करणारी व्यक्ती. सदर योजन्ोअंतर्गत शासन निर्णय दिनांक १७ मार्च २००९ नुसार रु. १,८५०/-(रुपये एक हजार आठशे पन्नास फक्त) शिष्यवृत्ती देण्यात येते.

६) औद्योगीक प्रशिक्षण संस्थेत प्रशिक्षण घेणा-या अनुसूचीत जातीच्या विद्याथ्यांर्ना विद्यावेतन देणे : अनुसूचीत जातीच्या विद्याथ्यांर्ना तांत्रीक शिक्षणाकडे वळविण्याकरीता औद्योगीक प्रशिक्षण संस्थेमध्ये प्रशिक्षण घेणा-या अनुसूचीत जातीच्या विद्याथ्यांर्ना या योजनेमधुन विद्यावेतन दिले जाते. या योजनेसाठी पालकांचे उत्पन्न रु. १,००,०००/(रुपये एक लाख फक्त) पर्यंत मयार्दित असणे आवश्यक आहे. पात्र विद्याथ्यांर्ना दरमहा रु. ६०/ पासून रु. १००/ पर्यंत विद्यावेतन देण्यात येते.

७) मागासवर्गीय अनुदानीत वसतीगृहांना सहायक अनुदान- सदर योजनेअंतर्गत अनुदानीत वसतीगृहातील लाभाथ्यांर्ना परिपोषण भत्ता दिला जातो.तसेच वसतीगृहांना भाडे अनुदान/परिरक्षअनुदान/व्यवस्थापन/भांडी कुंडी/फर्निचर इत्यादीसाठी अनुदान अदा करणेत येते.

८) आंतरजातीय विवाहीत दांपत्यांना प्रोत्साह्ापर अथसर्हाय देणे: अस्पृश्यता निवारण योजनेचा भाग म्हणून आंतरजातीय विवाहास प्रोत्साहन देण्यासाठी आंतरजातीय विवाहीत जोडप्यांस आर्थीक सहाय्य देण्याची योजना सन १९५८ पासून् शासनातर्फेन्र राबविणेत येते. शासन्ा निर्णय दिनांक ३० जानेवारी १९९९ नुसार आर्थिक सहाय्यामध्ये वाढ करुन रु. १५,०००/- करण्यात आलेले आहेत. दिनांक ३१.१.२०१० पूर्वी ज्या दांपत्यांचे विवाह झाले असतील त्यांना रु.१५,०००/- (रुपये पंधरा हजार फक्त) चे शासनाने विहीत केलेनुसार धनाकर्ष,राष्ट्रीय बचत प्रमाणपत्र व संसारोपयोगी साहित्य या स्वरुपात दिले जातात. तसेच शासन निर्णय क्रमांक आंजावि-२००७/प्र.क्र.१९१/मावक-२ विस्तार भवन मुंबई ३२ दिनांक १.२.२०१० च्या शासन् निणर्यानुसार वरिल अनुदानामध्ये वाढ करुन रु. ५०,०००/(रुपये पन्नास हजार फक्त) अनुदानाची रक्कम करणेत आली आहे. सदरची योजना विशेष मागास प्रवगार्तील जोडप्यांकरीताही लागू करणेत आलेली आहे.

१०) व्यसनमुक्ती प्रचार कार्य - सदरची योजना एप्रिल २००१ पासून जिल्हा परिषदेकडे वर्ग करणेत आली असुन या विभागाअंतर्गत प्रामुख्याने

खालील कार्यक्रम राबविण्यात येतात.
१. दारुबंदी प्रचार कार्यक्रम
२. अंमली पदार्थ सेवन विरुध्द मोहिम
३. व्यसनमुक्ती सेवा पुरस्कार योजना
४. केंद्रीय सामाजीक न्याय व अधिकारीता विभागातर्फे व्यसनमुक्ती केंद्र चालविणा-या संस्थांना अथसर्हाय्य.

११) शहु,फुले आंबेडकर दलितवस्ती विकास व सुधारणा अभियान - संत गाडगे महाराज ग्रामस्वच्छता तथा राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम अभियानाच्या धरतीवर महाराष्ट्र शासनाने सन २००६-०७ या वषापार्सुन शहु,फुले आंबेडकर दलितवस्ती विकास व सुधारणा अभियान सुरु केले आहे. सदर अभियानाचा उद्देश दलित वस्त्यांमध्ये स्वच्छता राहण्यासाठी तेथील रहीवाश्यांचा सहभाग वाढावा तसेच गावातील सामाजीक विषमता दुर होऊन अस्पृश्यता नष्ट व्हावी हा आहे. सदर अभियानांतर्गत राज्यात गुणानुक्रम येणा-या पहिल्या तीन ग्रामपंचायतींना अनुक्रमे रु. २५.०० लाख १५ लाख व १२.५० लाखांचे बक्षीस देण्यात येणार आहे. १. पंचायत समिती स्तरावर प्रत्येक पं.स.तील गुणानुक्रमे पहिल्या तीन ग्रामपंचयतींना अनुक्रमे रु. २५,०००/-रु. १५,०००/ व रु. १०,०००/- २. जिल्हा स्तरावरील गुणानुक्रमे उत्कृष्ट ठरणा-या पहिल्या तीन ग्रामपंचायतींना अनुक्रमे रु. ५.०० लाख रु. ३.००लाख व रु. २.०० लाख. ३. महसुल विभागस्तरावर उत्कृष्ट ठरणा-या गुणानुक्रमे पहिल्या एका ग्रामपंचायतीना रु. १०.०० लाख तसेच जास्त टक्केवारीसाठी राज्यातील पहिल्या तीन जिल्हा परिषदानां अनुक्रमे रु. १५.००लाख रु. १०.०० लाख व रु. ५.०० लाख सर्वात जास्त टक्केवारीकरीता राज्यातील पहिल्या तीन पंचायत समितींना अनुक्रमे रु. ७.५० लाख रु. ५.०० लाख व रु. २.५० लाख. दलितवस्ती विरहीत ज्या ग्रामपंचायतींची बक्षिसासाठी निवड होईल त्या ग्रामपंचायतींस रु. २५.०० लाख व सुवर्णपदक देण्यात येते. सदर अभियानाची सुरुवात दरवर्षी २० सप्टेंबर रोजी संत गाडगे महाराज व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छता अभियानाबरोबरच करावयाची असुन सदर अभियानात भाग घेण्यासाठी दलित कुटूंबांची लोकसंख्या किमान ५० असावी व अशा गावात अनु.जाती.,जमाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियम १९८९ अंतर्गत गुन्हा दाखल झालेला नसावा.

अपंगासाठीच्या योजना

•उद्देश

समाजातील दृष्टीहीन, कणबर्धिर, अस्थिव्यंग, मनोविकलांग व कुष्ठरोगमुक्त अपंग व्यक्तींकडे त्यांच्या अपंगत्वाकडे न पाहता त्यांच्यामध्ये असलेल्या सामर्थ्यांकडे पाहून त्यांच्या मधील असलेले सुप्त सामर्थ्य विकसित करुन त्यांना समाज जीवनाच्या सर्व अंगामध्ये समान संधी, संपूर्ण सहभाग व त्यांच्या हक्कांचे संरक्षण व्हावे या दृष्टीने महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय, तसेच इतर विविध विभागांमार्फत कल्याणकारी योजना राबविण्यात येतात. त्याचप्रमाणे सामाजिक सुरक्षिततेसाठी अपंगांना काही क्षेत्रामध्ये आरक्षण, सवलती, सूट व प्राधान्य देण्यात आलेले आहे. या सवांर्चे उद्देश अपंग व्यक्तींना सक्षम बनवून त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात समाविष्ट करणे हा आहे. त्या योजना खालीलप्रमाणे.

•आरोग्य

मुळातच अपंगत्व येऊ नये म्हणून अपंग प्रतिबंधात्मक कार्यक्रम, अपंग व्यक्तींचे सर्वेक्षण, शालेय आरोग्य तपासणी, जनजागृती, माता बाल संगोपन कार्यक्रम, वैद्यकीय अधिकारी व आरोग्य कमचाऱ्यांर्ना प्रशिक्षण, वेयक्तिक स्वच्छता व आरोग्य इत्यादी कार्यक्रम आरोग्य विभागामार्फत राबविण्यात येतात.

शिक्षण	अपंग विद्यार्थ्यांना विशेष शाळांमार्फत शिक्षण पालघर जिल्यामध्ये स्वयंसेवी संस्थांमार्फत दृष्टीहीन, कर्णबधिर, अस्थिविकलांग विदयार्थ्यांसाठी ७ शाळा आहेत.
योजनेचे स्वरुप	अपंग विद्यार्थी अतितीव्र अपंगत्वामुळे सामान्य मुलांबरोबर सामान्य शाळेत येऊ शकत नाहीत. अशा विद्यार्थ्यांसाठी तसेच स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविल्या जाणाऱ्या अपंगांच्या विशेष शाळांमधून दृष्टीहीन, कर्णबधिर, अस्थिविकलांगांसाठी शिक्षणाची सोय केली आहे. या शाळा निवासी व अनिवासी स्वरुपाच्या

	असून निवास, भोजनाची विनामुल्य सोय आहे.
अटी व शर्ती	• वय वर्षे 6 ते 18 वयोगटातील असावा. • अपंगत्वाचे प्रमाणपत्र जिल्हा शल्य चिकित्सकाकडून प्राप्त केलेला असावा. • अस्थिव्यंग प्रवर्गातील अपंगत्व 40% हून अधिक असावे. कर्णबधिर विद्यार्थ्यांची श्रवण मर्यादा 26 ते 91 किंवा त्याहून अधिक डी.बी. असावी. अंध विद्यार्थी दोन्ही डोळयांनी अंध असावा, अल्पदृष्टी असल्यास 30% हून अधिक असावी. मतिमंद विद्यार्थ्यांचा बुद्ध्यांक 70 हून कमी असावा.
संपर्क	• संबंधित शाळेचे मुख्याध्यापक • जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद.

योजनेचे नाव	शालांत परिक्षा पूर्व शिक्षणासाठी अपंग विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती
योजनेचे स्वरुप	सामान्य शाळेमध्ये तसेच अपंगांच्या विशेष अनिवासी शाळेमध्ये इयत्ता पहिली ते दहावी पर्यंत शिक्षण घेणाऱ्या अपंग विद्यार्थ्यांना शालेय शिक्षणाची इयत्ता पहिली ते चौथी दरमहा रु. 50/- इयत्ता पाचवी ते सातवी दरमहा रु. 75/- इयत्ता नववी ते दहावी दरमहा रु. 100/- तसेच मतिमंदांच्या विशेष अनिवासी शाळेतील मतिमंद विद्यार्थ्यांना दरमहा रु. 75/- या दराने शिष्यवृत्ती देण्यात येते.
अटी व शर्ती	• अर्जदार इयत्ता 10 वी पर्यंत कोणत्याही इयत्तेत शिक्षण घेणारा असावा. • कर्णबधिर विद्यार्थ्यांच्या बाबतीत पायरी वर्गातील विद्यार्थ्यांनाही या योजनेचा लाभ देता येईल. • मतिमंद विद्यार्थी समाज कल्याण विभागाच्या मान्यताप्राप्त अनिवासी शाळेचा विद्यार्थी असावा. त्याचा बुद्ध्यांक 70 हून कमी असावा. • अर्जदार हा सामान्य शाळेत अथवा अपंगांसाठीच्या विशेष शाळेत शिकत असल्यास त्याला या योजनेचा लाभ घेता येईल. • अर्जदार एकाच वर्गात एकापेक्षा अधिक वेळा अनुत्तीर्ण झाल्यास शिष्यवृत्ती बंद करण्यात येईल.

	• अर्जासोबत वार्षिक परिक्षेची गुणपत्रिका व अपंगत्व प्रमाणपत्राची सत्यप्रत जोडण्यात यावी. • या शिष्यवृत्तीसाठी उत्पन्नाची मर्यादा राहणार नाही.
संपर्क	• संबंधित शाळेचे मुख्याध्यापक • जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद.

योजनेचे नाव	शालांत परिक्षोत्तर शिक्षणासाठी अपंग विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती
योजनेचे स्वरुप	अंध, अधूदृष्टी, कुष्ठरोगमुक्त, कर्णबधिर, अस्थिव्यंग, मतिमंद विद्यार्थ्यांना इयत्ता दहावी नंतरचे महाविद्यालयीन व्यावसायिक, तांत्रिक व अभियांत्रिकी शिक्षणासाठी त्यांच्या अभ्यासक्रमाच्या दर्जाप्रमाणे अभ्यासक्रमाचे गट करुन शिष्यवृत्तीची रक्कम देण्यात येते. त्याचप्रमाणे अंध विद्यार्थ्यांना वाचक भत्ता तसेच सर्व अपंग विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती बरोबर शैक्षणिक शुल्क, प्रकल्प टंकलेखन खर्च, अभ्यास दौरा खर्चाची रक्कम दिली जाते.
अटी व शर्ती	• अपंग विद्यार्थी महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा. • राज्यांतर्गत शिक्षण घेणाऱ्या राज्यातील अंध, अंशत: अंध, कर्णबधिर, अस्थिविकलांग, मतिमंद, मानसिक आजार व कुष्ठरोगमुक्त विद्यार्थ्यांस या योजनेचा लाभ घेता येईल. • अर्जदाराने जे शिक्षण एकदा पूर्ण केलेले आहे, त्याच दर्जाच्या शिक्षणासाठी परत व व्यावसायिक शिक्षण पूर्ण् केल्यानंतर हया शिष्यवृत्तीचा लाभ दिला जाणार नाही. (उदा.बी.कॉम नंतर बी.एस्सीला प्रवेश असल्यास) • वैद्यकीय पदव्यूत्तर शिक्षणासाठी विद्यार्थ्यांना बाहेर मेडीकल प्रॅक्टीस करावयास बंदी घातली असेल अशाच विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ घेता येईल. • अर्जदार गट अ वगळता प्रत्येक वर्षी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. गट अ मधील विद्यार्थ्यांना एकवेळ अनुत्तीर्ण झाला तर शिष्यवृत्ती पुढे चालू ठेवता येईल. • जे विद्यार्थी मान्यताप्राप्त विद्यापीठाचा अथवा संस्थेचा पत्रव्यवहाराव्दारे अभ्यासक्रम पूर्ण करतात अशा

	अभ्यासक्रमासाठी किंवा निरंतर शिक्षणासाठी ना परतावा शुल्क भरणे लागत असल्यास अश विद्यार्थ्यांना वार्षिक रु. 500/- पुस्तके व साहित्य खरेदीसाठी अर्थसहाय्य देण्यात येईल. • अर्जदार सदरहू शिक्षणासाठी गुणवत्ता शिष्यवृत्ती खेरीज इतर कोणतीही शिष्यवृत्ती अथवा विद्यावेतन घेत नसावा. • अर्जासोबत वार्षिक परिक्षेची गुणपत्रिका, जिल्हा शल्य चिकित्सक यांचेकडील अपंगत्व प्रमाणपत्र जोडावे. • जे विद्यार्थी विद्यालयाच्या, महाविद्यालयाच्या अथवा मान्यताप्राप्त वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांना----- दराने शिष्यवृत्ती देण्यात येईल. • या शिष्यवृत्तीसाठी उत्पन्नाची मर्यादा राहणार नाही.
संपर्क	• संबंधित शाळेचे मुख्याध्यापक • जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद .

योजनेचे नाव	कार्यशाळांमधून अपंगांना व्यवसाय प्रशिक्षण
योजनेचे स्वरुप	18 ते 45 वयोगटातील प्रौढ अपंग व्यक्तींना सामाजिक न्याय विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या अपंगांच्या कार्यशाळेमधून रोजगार व स्वयंरोजगाराचे वेगवेगळया व्यवसायाचे मोफत प्रशिक्षण निवासी व अनिवासी देण्यात येते. राज्यात चार शासकीय कार्यशाळा आणि एक औद्योगिक प्रशिक्षण केंद्र व 78 स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविण्यात येणाऱ्या कार्यशाळा आहेत.
अटी व शर्ती	• वय वर्षे 18 हून अधिक असावे. • अपंगत्वाचे प्रमाणपत्र जिल्हा शल्य चिकित्सकाकडून प्राप्त केलेले असावे. • अस्थिव्यंग प्रवर्गातील अपंगत्व 40% हून अधिक असावे. कर्णबधिर विद्यार्थ्यांची श्रवण मर्यादा 26 ते 91 किंवा त्याहून अधिक डी.बी. असावी. अंध विद्यार्थी दोन्ही डोळयांनी अंध असावा, अल्पदृष्टी असल्यास 30% हून अधिक असावी. मतिमंद विद्यार्थ्यांचा बुद्ध्यांक 70 हून कमी असावा.

	• ज्या व्यवसायाचे प्रशिक्षण घ्यावयाचे आहे त्यासाठीची किमान शैक्षणिक अहर्ता प्राप्त केलेली असावी.
संपर्क	• संबंधित शाळेचे मुख्याध्यापक • जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद.
योजनेचे नाव रोजगार व स्वयंरोजगार :	अपंग व्यक्तींना स्वयंरोजगारासाठी बीज भांडवल
योजनेचे स्वरुप	18 ते 50 वयोगटातील दृष्टीहीन, कर्णबधिर, अस्थिविकलांग अपंग व्यक्तींना स्वयंरोजगारासाठी रु. 1,50,000/- च्या व्यवसायाकरीता 80% बँकेमार्फत कर्ज व 20% अथवा कमाल रु. 30,000/- अनुदान स्वरुपात दिले जाते.
अटी व शर्ती	• अर्जदाराचे अपंगत्व किमान 40% त्यापेक्षा जास्त असणे आवश्यक आहे. • अर्जदाराचे वय 18 ते 50 वर्षे असणे आवश्यक आहे. • लाभार्थी पालघर जिल्हयातील रहिवासी असावा. • जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद.
संपर्क	• जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद.

•<u>अडथळा विरहीत वातावरणाची निमिर्ती :</u>

अपंग व्यक्तींना सावजर्निक व इतर ठिकाणी प्रवेश करणे सोईचे व्हावे या दृष्टीने इमारत बांधकाम नियमावलीमध्ये केंद्र शासनाच्या सुचनेनुसार महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम 1966 च्या कलम 37 मध्ये आवश्यक ते फेरबदल करण्याबाबत नगर विकास विभागाचे आदेश आहेत. शासकीय इमारतींचे बांधकाम करताना अपंग व्यक्तींना मुक्त संचाराच्या दृष्टीने इमारतीमध्ये अपंग व्यक्तींसाठी असणाऱ्या आवश्यक सोई सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत सावजर्निक बांधकाम विभागात सूचना केलेल्या आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या वाहतूक बसमध्ये अपंगांसाठी आरक्षित आसन तसेच अपंगांना प्रवास भाडयामध्ये सवलती इ. सुविधा उपलब्ध करुन दिलेल्या आहेत.

•सामाजिक सुरक्षितता व सकारात्मक उपाय योजना :

योजनेचे नाव	अपंग व्यक्तींना कृत्रिम अवयव व साधने पुरविणे
योजनेचे	शारिरीक पुनर्वसनाच्या दृष्टीने अस्थिविकलांग व्यक्तींकरीता कॅलिपर्स कृत्रिम अवयव, तीन चाकी सायकल,

स्वरुप	कर्णबधिरांकरीता श्रवणयंत्र व अंध व्यक्तींना चष्मे, काठया तसेच इयत्ता दहावी नंतरचे शिक्षण पूर्ण करण्यासाठी अंध विद्यार्थ्यांना टेप रेकॉर्डर व दहा कोऱ्या कॅसेट्सचे संच दिले जातात.
अटी व शर्ती	• या योजनेंतर्गत मासिक उत्पन्न रु. 1,500/- पर्यंत असणाऱ्या अर्जदारास अवयव व साधनांच्या खरेदीसाठी 100% तर मासिक उत्पन्न रु. 1,501/- ते 2,000/- पर्यंत असणाऱ्या अर्जदारास 50% अथसहाय्य देण्यात येईल. ही योजना प्रौढ व्यक्तींसाठी 3 ते 5 वर्षातून एकदा आणि 15 वर्षाखालील मुलांना दरवर्षी लागू असेल. या योजनेंतर्गत अर्थसहाय्याची मर्यादा किमान रु. 25/- व कमाल रु. 3,000/- अशी राहील. कृत्रिम अवयवांच्याबाबतीत अवयव बसविण्यासाठी आकारण्यात येणाऱ्या खर्चाच्या 15% रक्कम लाभार्थ्यांस देण्यात येईल. • श्रवणयंत्रासाठी अर्जदाराची वयोमर्यादा वय वर्षे 55 पर्यंतच आहे. अर्जासोबत नाक-कान-घसा तज्ञ डॉक्टरच्या सही शिक्क्यानिशी श्रवणऱ्हासाचा आलेख जोडणे आवश्यक आहे. शाळेत शिकणाऱ्या नोकरी किंवा व्यवसाय करणाऱ्या व्यक्तीसच श्रवणयंत्र दिले जाते. या कार्यालयाकडील मान्यताप्राप्त कंपनीकडूनच श्रवणयंत्र घेणे बंधनकारक असते. श्रवणयंत्रासाठी वैयक्तीक अर्ज केलेल्या अर्जदाराच्या चौकशीनंतर चौकशी अहवाल आल्यावरच श्रवणयंत्र दिले जाते. • तीन चाकी सायकलसाठी अर्जदाराचे वय किमान 18 वर्षे पूर्ण असावे. अर्जदार एकाच पायाने अधू नसावा. दोन्ही पायांनी अपंग व्यक्तीसच तीन चाकी सायकल दिली जाते. वैद्यकीय दाखला/अपंगत्वाचे प्रमाणपत्र स्वयंस्पष्ट असावे. तसे नसल्यास अपंगत्व स्पष्ट होईल असे अर्जदाराचे छायाचित्र सोबत जोडणे आवश्यक आहे. • कृत्रिम अवयव, कॅलिपर्स इ. साठीच्या अर्जासोबत अपंगत्वाचा स्पष्ट उल्लेख असणारा वैद्यकीय दाखला जोडावा. त्या अपंगत्वानुसार लागणाऱ्या कृत्रिम अवयव/साधनांचा अर्जात स्पष्ट उल्लेख असावा. अर्जदाराला यापूर्वी या कार्यालयाकडून कोणत्या स्वरुपाची मदत मिळाली हे नमूद करावे.
संपर्क	• जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद.

योजनेचे नाव	अपंग व्यक्तींना एस.टी. प्रवास भाडयामध्ये प्रवास सवलत
योजनेचे स्वरुप	अपंग व्यक्तींना दिलेल्या ओळखपत्राच्या आधारे एस.टी. प्रवास भाडयामध्ये अपंग व्यक्तीस 75% व त्याच्या सोबत्यास 50% प्रवास सवलत देण्यात आली आहे.
अटी व शर्ती	• अपंगत्वाचे प्रमाणपत्र जिल्हा शल्य चिकित्सकाकडून प्राप्त केलेले असावे. • अपंगत्वाचे प्रमाण 40% हून अधिक असावे. • लाभार्थी पालघर जिल्हयातील रहिवासी असावा.
संपर्क	जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद.

•नाविण्यपूर्ण उपक्रम :

•तालुकास्तरावर जनजागृती मेळावे :

अपंग कल्याण व पुनवसनाच्या विविध योजना केंद्र शासन, राज्य शासन व जिल्हा परिषदेमार्फत कायार्न्वित आहेत. तथापि ग्रामिण भागातील अपंग व्यक्ती व त्यांचे पालक यांना या योजनांची माहिती नसल्याने पात्र अपंग व्यक्ती या योजना मिळण्यापासून वंचित राहतात.

या विविध योजनांबरोबरच समाजात अपंगत्व प्रतिबंधात्मक उपाय, अपंगांचे शिक्षण/प्रशिक्षण व पुनर्वसन यांची अनुषंगिक माहिती ग्रामीण भागापर्यंत पोहचविण्यासाठी पालघर जिल्हयाच्या प्रत्येक तालुक्यात अपंगांचे मेळावे आयोजित करण्यात येणार आहेत.

अपंग विदयाथ्यांमध्ये असलेल्या क्रिडागुणांना वाव देण्यासाठी जागतिक अपंग दिनाचे औचित्य साधुन विशेष अपंग मुलांच्या क्रिडास्पर्धा जिल्हासतरावरुन आयोजित केल्या जातात.

जिल्हा परिषद सेस फंडातुन 3% अपंग कल्याण योजनेतुन अपंगांना स्वयंरोजगारासाठी अथसर्हाय्य देणेंत येते.

अजार्चे नमुने

जिल्हा परिषद योजना	
1	मागासवर्गीयांना नवीन घर बांधणेसाठी अथवा घर दुरुस्तीसाठी अर्थसहाय्य करणे
2	मागासवर्गीयांना नवीन घर बांधणेसाठी अथवा घर दुरुस्तीसाठी अर्थसहाय्य करणे
3	इ.५ वी ते ९ वीच्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना सायकली पुरविणेसाठी बर्ज
4	मागासवर्गीय महिलांना व पुरुषांना स्वयंरोजगारासाठी शिलाई मशीन पुरविणेसाठी अर्ज

5	मागासवर्गीय गरोदर महिलांना शासकिय संस्थांमध्ये बाळंत झाल्यास त्यांना मच्छरदाणी व अनुषंगिक साधणे पुरविणे
6	मागासवर्गीय लाभार्थ्यांना घरघंटी पुरविणेसाठी अर्ज
7	मागासवर्गीयांना पापड मशिन पुरविणेसाठी अर्ज
8	मागावर्गीय लाभार्थ्यांना शिक्षणासाठी अर्थसहाय्यसाठी अर्ज
9	मागासवर्गीय लाभार्थ्यांना बॅजो पुरविणेसाठी अर्ज
10	मागासवस्तीत समाज मंदिरामध्ये खुर्च्या,भांडी,सतरंजी पुरविणेसाठी अर्ज
11	२०% निधीमधून मागासवर्गीय वस्तीमध्ये अंतर्गत रस्ते बांधकामासाठी अनुदान मागणी अर्ज
शासकीय योजना	
1	चेकलिस्ट(दलित वस्ती सुधार योजना) जि.पालघर
2	आंतरजातीय विवाह योजनेआंतर्गत आर्थसहाय्य मिळण्यासाठी करावयाच्या अर्जाचा नमुना
3	सुचीपत्र
4	अस्वछ्य व्यवसायात काम करणा-या पालकांच्या पाल्यांना शिष्यवृत्ती